ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणे बाबत.(श्री.रविंद्र गुलाब शेलार, सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत वडगाव तनपुरा तालुका कर्जत)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/६२८६३२/२०२६ । ३९
दिनांक-२२/०१/२०२६

संदर्भ- १.या कार्यालयाकडील दोषारोपपत्र/ज्ञापन क्रं.साप्रवि-२/ग्राप-३/२५६/२०२०, दि.३/३/२०२०

२. श्री.शेलार रविंद्र गुलाब, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडगांव तनपुरा ता.कर्जत यांचा खुलासा दि.१८/३/२०२०

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (५)

४. या कार्यालयाकडील आदेश क्रं.साप्रवि-२/ग्राप-३/४०२/२०२० दि.८/६/२०२०

५. सहा.आयुक्त चौकशी, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्रं.विशा-४/खचौ/ सी.आर. ५९/ २०२०, दि.१७/११/२०२१

६. या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रं.साप्रवि- २/ग्राप-३/३७/२०२२ दि.१३/०१/२०२२

७. या कार्यालयाकडील शिक्षेचा आदेश क्रं.साप्रवि-२/ग्राप-३/१२-२०२०/५१९/२०२२ दि.२९/६/२०२२

८. अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील अपील क्रं.४२/२०२२, दि.२४/०२/२०२३

९. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा(शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३(४) नुसार

१०. विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील नियम २.२-(ब)

११. मानीव निलंबन आदेश साप्रवि२/ग्रांप३/८३०/२०२३ दिनांक ३१/१०/२०२३

१२. द्वितीय सुनावणी दिनांक १५/०५/२०२४

१३.श्री.शेलार यांचा खुलासा दिनांक २०/०६/२०२४ व दिनांक ०७/१०/२०२४

संदर्भ क्रमांक ११ चे आदेशान्वये श्री.रविंद्र गुलाब शेलार सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वडगाव तनपुरा तालुका कर्जत यांना दिनांक २९/०६/२०२२ च्या आदेशाचे तारखे पासून पुढील आदेश होईपर्यंत मानीव निलंबन समजणेत येण्याचा आदेश पारित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा(शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (५) अन्वये व अपर आयुक्त यांचे निकालपत्राचे अनुषंगाने श्री.रविंद्र गुलाब शेलार सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी व गट विकास अधिकारी पंचायत समिती कर्जत यांची दिनांक २०/११/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रथम सुनावणी घेण्यात येऊन उपलब्ध दस्तऐवजांची तपासणी पडताळणी करण्यात आली. संदर्भ क्रमांक १२ अन्वये प्रकरणी पुन्हा द्वितीय सुनावणी घेण्यात आलेली आली. प्रकरणी श्री.शेलार यांनी दिनांक २०/०६/२०२४ व दिनांक ०७/१०/२०२४ रोजी खुलासा सादर केलेला आहे. प्राप्त सर्व खुलाशयाचे दस्तऐवजांचे अवलोकन करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-१११११/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक- १४/१०/२०११ मधील तरतुदींनुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या व्दारे श्री.रविंद्र गुलाब शेलार मानीव सेवा निलंबित ग्रामपंचायत अधिकारी मुख्यालय पंचायत समिती पाथर्डी यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर पंचायत समिती----ग्रा.पं. मढी, ता. पाथर्डी----येथे पुन:स्थापित करीत आहे. सबब पुन:स्थापनेने हजर झाल्याचे दिनांकापासून श्री. रविंद्र गुलाब शेलार यांचे मानीव निलंबन संपुष्टात येईल.

श्री.रविंद्र गुलाब शेलार सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांचे निलंबन कालावधीचा निर्णय स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

या आदेशाची नोंद रविंद्र गुलाब शेलार मानीव सेवा निलंबित तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती कर्जत यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२३०६०००६ असा आहे.

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.रविंद्र गुलाब शेलार सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती कर्जत
सध्या मुख्यालय पं.स.पाथर्डी

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----पाथर्डी----

२/- श्री.रविंद्र गुलाब शेलार सक्तीने सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी या पदावर सेवेत हजर झालेनंतर हजर अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी पंचायत समिती कर्जत यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.